सन २०२६-२७ करिता लेखाशिर्ष २२५१ ००४२ अंतर्गत ३१ - सहायक अनुदाने (वेतनेत्तर) अर्थसंकल्पिय तरतूदीतून निधीचे वितरण - राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग..

**महाराष्ट्र शासन**

**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : रागांवि-८३२५/प्र.क्र.१३८/प्रशा-१ (E-११६४३२४)**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०२६

वाचा:

१. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचे पत्र क्र. निधीवि-२०२६/प्र.क्र.३१/रागांवितआ/२४८, दिनांक १३ मे, २०२६.
२. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचे पत्र क्र. निधीवि-२०२६/प्र.क्र.३१/रागांवितआ/३६३, दिनांक २३ जुलै, २०२६

**शासन निर्णय :-**

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगास सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये ३१ - सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (सशर्त) या तपशिलवार लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ६०% या मर्यादेत पहिल्या नऊमाहीसाठी **एकूण रु. १८,३०,००,०००/- (रुपये अठरा कोटी तीस लाख फक्त)** इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. लेखा अधिकारी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांनी रु. **१८,३०,००,०००/- (रुपये अठरा कोटी तीस लाख फक्त)** या रकमेचे देयक सादर करुन मंजूर करुन घ्यावे. व सदर रक्कम सदस्य-सचिव, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांना सुपूर्द करण्यात यावी. सदर खर्चाकरिता लेखा अधिकारी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय हे आहरण व संवितरण अधिकारी व उपसचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग हे नियंत्रक अधिकारी राहतील.

३.  सदर अनुदानाच्या रकमेचा विनियोग सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ मधील नमूद प्रयोजनासाठीच करण्यात यावा. तसेच त्यामधून खर्च करताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या अनुदानाच्या विनियोगाची तपासणी करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र व कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावा.

४.  उपरोक्त खर्च सन २०२६-२७ करीता मागणी क्रमांक ए-५, मुख्यलेखाशिर्ष २२५१ सचिवालयीन-सामाजिक सेवा ०९० सचिवालय (००) (००) (०३) विज्ञान व तंत्रज्ञान यामध्ये समन्वय व संशोधन (कार्यक्रम) (२२५१ ००४२), ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (सशर्त) या तपशिलवार लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५.  सदर शासन निर्णय वित्त विभागाने **अनौपचारिक संदर्भ क्र. ४७१/२०२६/व्यय-४** अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९१८१३२००६६७११ असा आहे. हा निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI,
2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.09.18 13:20:47 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) सदस्य-सचिव, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मंत्रालय, मुंबई
६) वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई
७) लेखाअधिकारी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय (रोखशाखा) तीन प्रती.
८) निवडनस्ती.